# दि बिशप्स स्कूल, कॅम्प

## मराठी दिवस वृत्तांत

२०२३-२०२४

**(वरिष्ठ विभाग)**

आपली शान मराठी

आपला मान मराठी !

जगण्याचा ध्यास मराठी

महाराष्ट्राचा श्वास मराठी !

२७ फेब्रुवारी या दिवशी आपल्या सर्वांचे लाडके कवी, मराठी साहित्यकार, मराठी साहित्याचा मानदंड वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी ३१ जानेवारीला मराठी दिवस मोठ्या उत्साहाने साजरा झाला. ढोल ताशाच्या गजरात इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी माननीय मुख्याध्यापकांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हातून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.







कोणत्याही शुभकार्यापूर्वी गणरायाचे पूजन केले जाते. त्यामुळे नृत्याद्वारे गणनायकाचे मंचावर आवाहन करण्यात आले.






त्यानंतर २०२३ हे 'अमृतमहोत्सवी' वर्ष असल्याने 'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी 'महाराष्ट्रगीत' म्हणून जाहीर केले असल्यामुळे आपल्या शाळेतील सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी ते उत्स्फूर्तपणे सादर केले. संपूर्ण वातावरण स्फूर्तीवर्धक व उर अभिमानाने भरून आणणारे होते.





इयत्ता ७-ड च्या आरुष बेडेकर याने 'पर्यावरण', ८-ड च्या विराज म्हेत्रे याने 'मित्र' आणि ९-ड च्या अर्णव वालगुडे याने 'आई' या सुंदर कविता सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.
प्रांशू अगरवाल इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्याने आपल्या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षकांचे मनसोक्त मनोरंजन केले.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष पूर्ण होत आहेत. 'न भूतो न भविष्यती' अशा थोर तेज:पुंज छत्रपती शिवाजी महाराजांची कीर्ती पोवाड्यातून इयत्ता नववीच्या दिशांत अरगडे याने उत्कृष्ट रीतीने सादर केली. महाराष्ट्र हे सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असे राज्य आहे. अशा या महाराष्ट्राच्या संस्कृतीतील काही गीत, नृत्य "महाराष्ट्राची लोकधारा" माध्यमातून मुलांनी सादर केले. यात वासुदेव, गोंधळ, कोळी नृत्य आणि पालखी या लोककला सादर करण्यात आल्या.









आभार प्रदर्शनाने व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. इयत्ता नववीतील आशुतोष पंधेरे आणि अथर्व यादव यांनी सूत्रसंचालन केले.

शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री गेनर सरांनी आपल्या भाषणातून प्रेक्षकांना अमूल्य मार्गदर्शन केले. आपले प्राचार्य माननीय मॅकफरसन सर, मुख्याध्यापक श्री गेनर सर यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचे प्रदर्शन करण्याची संधी दिली म्हणून त्यांना खूप खूप धन्यवाद.








**सौ. वर्षा यादव**
मराठी विभाग
**(वरिष्ठ विभाग)**